# नियमित दिवाणी मुकदमा क्र. ०१/२०११

## नि. १३९ व १४० वरील एकत्रात आदेश

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादीने मयत प्रतिवादी नं. २ चे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यासाठी नि. १३९ कडे अर्ज दाखल केला आहे. तर नि. १४० कडील अर्ज प्रतिवादी नं. २ ही मयत झाल्याने तिचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यामध्ये सामील करण्यासाठी दाखल केला आहे. वादीचे अर्जातील कथन की, प्रतिवादी नं. २ राजश्री रवळनाथ पुनाळेकर या दिनांक ०७/११/२०१९ रोजी मुंबई येथे मयत झाल्या आहेत. प्रतिवादी नं. २ या मुंबई येथे मयत झाल्याने त्यांना मयत दाखला वेळेत प्राप्त होवू शकला नाही. प्रतिवादी नं. २ चे वारस दाव्यात सामील करुन न घेतल्यास वादी यांचे हक्कास बाधा येणार आहे. तरी अर्ज मंजुर करण्यात यावे अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

२. प्रतिवादीने अर्जावर म्हणणे दाखल करुन, अर्जातील कारण संयुक्तीक नाही. ते मृत्युची तारीख घेवून अर्ज दाखल करु शकले असते. तरी अर्ज नामंजुर करण्यात यावा. परंतु अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास रक्कम रुपये २००/– प्रतिवादीस देण्याबाबत आदेश करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा कायम ताकीद आदेशासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं. २ राजश्री रवळनाथ पुनाळेकर या दिनांक ०७/११/२०१९ रोजी मुंबई येथे मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.२ च्या मृत्यु दाखल्याची प्रत वादीने नि. १३८ सोबत दाखल केली आहे. वादी क्र. २ याने सदरचा अर्ज मयत प्रतिवादी नं. २ चे वारस दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यासाठी व प्रतिवादी नं. २ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत अर्जात दिलेले कारण संयुक्तीक वाटते. प्रस्तुतचा दावा कायम ताकीद आदेशासाठी असल्याने

परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं.२ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादी नं. २ चे वारस दाखल करण्यास १८ दिवसाचा विलंब झाल्याचे दिसते. सबब मयत प्रतिवादी नं. २ चे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणेकरीता नि. १३९ व १४० कडील अर्ज मंजुर होण्यास पात्र आहेत. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. १३९ व १४० कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. मयत प्रतिवादी नं. २ हिचे कायदेशीर वारस दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. वादीस, मयत प्रतिवादी नं. २ चे कायदेशीर वारस अभिलेखावर दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

४. वादीने १४ दिवसात दाव्यात तशी दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत दाव्यात सामील करावी.

५. प्रस्तुतचा मुळ आदेश नि. १३९ सोबत ठेवण्यात यावा व नि. १४० सोबत या आदेशाची प्रत ठेवण्यात यावी.

Sadanand Baburao Patil
Digitally signed by Sadanand Baburao Patil
Date: 2020.12.16 16:56:41 +0530

दिनांक– ११/१२/२०२०

(एस्. बी. पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.